# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४८/२०१६ मधील
# निशाणी क्र.४१ वर आदेश

**CNRNO.MHLA110008882018.**

१. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. सदरचा अर्ज प्रतिवादींनी नि.क्र.२२ वर अतिरीक्त उलटतपास नसल्याबाबत झालेला हुकूम बाजुस सारुन साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास परवानगी देण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जाला वादींनी म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविलेला आहे. सदरचे प्रकरण सन–२०१६ पासून प्रलंबित आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादी हे बाहेरगावी गेल्यामुळे व महत्त्वाचे कागदपत्र न मिळाल्यामुळे प्रतिवादींतर्फे अतिरिक्त उलटतपास घेता आले नाही, असे कथन केलेले आहे. प्रतिवादींनी अर्जातील कथनाच्या पृष्ठर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदरचा दावा मिळकतीच्या वाटपाकरिता व उदरनिर्वाह भत्ता मंजुर करण्याकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याचे स्पष्ट होते. सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढुन प्रतिवादींना बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींवर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.४१ वरील अर्ज प्रतिवादींवर रु.३००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात द्यावे.

स्वा/-
(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

दि. १६.०७.२०१९.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 16.07.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 16.07.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 17.07.2019 |